# ग्रामपंचायत कार्यालय भूत्याणे, तालुका- चांदवड, जिल्हा – नाशिक

## सूचना क्रमांक १ (प्रथम प्रसारण)

ग्रामपंचायत भूत्याणे तालुका चांदवड जिल्हा नाशिक यांचेकडील विकास कामाकरिता खालील कामाची निविदा योग्य नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ऑनलाइन मागविण्यात येत आहे. दिनांक ०१/१२/२०२१ ते दिनांक ०६/१२/२०२१ ला दुपारी. ०३.०० वाजेपर्यंत निविदा भरण्यात येईल. तसेच ०७/१२/२०२१ ला दुपारी. ०३.०० वा. निविदा उघडण्यात येईल. उपरोक्त निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

| Sr No | Work Name | Duration of work | Tender amount Rs. | Tender fees | Earnest Money Deposit | Performance Security Deposit |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Providing and Erecting Solar Offgrid System At GRampanchayat Bhutyane Tal Chandwad** | 180 | 400000/- | 200/- | 4000/- | 1% |

### निविदा बाबत आवश्यक बाबी :-

१) ठेकेदाराने आपली कागदपत्र दोन लिफाफा मध्ये अपलोड करणे बंधनकारक आहेत .

अ) **तांत्रिक लिफाफा (Technical Cover) व** ब) **आर्थिक लिफाफा (Financial Cover)**

### लिफाफा क्र १ :- आर्थिक लिफाफा (Technical Cover)मध्ये भरावयाचे कागदपत्रे

i) निविदा फी व बयाना रक्कम ऑनलाईन भरलेली स्कॅन कॉपी अपलोड करणे बंधनकारक आहे.
ii) प्राप्तीकर पॅन कार्ड स्कॅन करून अपलोड करावे.
iii) GST प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे.
iv) निविदा प्रक्रियांमध्ये सर्व टप्प्यांवर सादर केलेली सर्व माहिती खरी असल्याचे १००/- स्टम्प पेपर वर हमी पत्र अपलोड करावे.
v) सलग तीन वर्षाचे ITR / VAT प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.
vi) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र अपलोड करावे.
vii) बयाना रक्कम निविदा फी अथवा इतर कोणत्याही फी मध्ये सुट असल्याचा त्याबाबतचे सक्षम अधिकारी दाखला अपलोड करावे.
viii) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र अपलोड करावे.
ix) सुरु असलेल्या कामाचा तपशील (कार्यारंभ आदेश ) सोबत काम सुरु असल्याचे पुरावे सादर करावे.
x) या पूर्वी केलेल्या कामाचा (काम पूर्णत्वाचा दाखला ) अनुभव सोबत काम पूर्ण केल्याचे पुरावे सादर करावेत.
xi) तांत्रिक मनुष्यबळ बाबतचा पुरावा.
xii) निविदा पूर्व बैठक दिनांक ०३/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालय भूत्याणे ता.चांदवड येथे आयोजित केलेली असून निविदा पूर्व बैठक दाखला अनिवार्य आहे. तसेच निविदा पूर्व बैठकीस उपस्थित असणे बंधनकारक असून त्यांनाच सदर निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल.

### लिफाफा क्र २ :- आर्थिक लिफाफा (FInancial cover)मध्ये भरावयाचे कागदपत्रे

१) BOQ / कामाचे दर सादर करावे.
२) १२ फेब्रुवारी २०१६ सा.बा.च्या शासन निर्णयानुसार निविदा वजा १% ते वजा १०% च्या रक्कमेमध्ये निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदारांनी Performance Security Deposit कामाच्या रक्कमेचा १% डी.डी. ची स्कॅन कॉपी अपलोड करणे आवश्यक आहे.

### निविदा बाबत आवश्यक बाबी :-

१) सदर संपूर्ण निविदा ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदा संदर्भातील निविदा नोटीस, प्रसिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इत्यादी. माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) निविदा प्रपत्र डाउनलोड करुन फी रक्कम रु. २००/- व अनामत रक्कम ४०००/- ग्रामपंचायत भूत्याणे यावर RTGS/NEFT/Net Banking द्वारे जमा करून UTR क्र .नोंदवून स्कॅन केलेली पावती अवश्यक कागद पत्रासोबत अपलोड कराव्यात.

३) सदर कामाची निविदा फी व इसारा रक्कम PAYMENT GETEWAY/ONLINE TRANSFER ने करणे गरजेचे आहे.

४) सदर इसारा रक्कम भरण्यास सूट असल्यास सक्षम प्राधीकार्याच्या प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी लागेल.

५) कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र (फोटोसहीत) अपलोड करावे.

६) सलग तीन वर्षाचे ITR / VAT प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

७) GST प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे.

८) निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

९) उपरोक्त कागदपत्रे करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलती दिली जाणार नाही.

१०)उपरोक्त कागदपत्रात दिलेल्या अटी व शर्ती पूर्तता केलेल्या नसल्यास ठेकेदार/पुरवठा धारकाची निविदा रद्द करण्यात येईल व आर्थिक लिफाफा (Financial Bid) उघडण्यात येणार नाही तसेच कोणतेही कागदपत्र Offline स्वीकारण्यात येणार नाही किंवा कागदपत्र स्वीकारण्यास कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

११)निविदा अंतिम झाल्यानंतर संबंधित कंत्राटदारास अंदाजपत्रका प्रमाणे १००% काम पूर्ण झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार कामाची रक्कम अदा करण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२)सदर कामाचे टेस्टिंग रिपोर्ट,धावते,अंतिम मुल्यंकन इत्यादी. दाखले मुदतीत घेऊन ग्रामपंचायत सचिवाकडे सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१३) शासकीय / ग्रामपंचायत क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा.

१४)कामावर वापरण्यात येणारे विद्युत साहित्य ISI मार्कचे / मान्यताप्राप्त दर्जाचे असावे.

१५)विद्युत वीजसंच मांडणी उभारणी प्रचलित भारतीय विज सुरक्षा नियम २०१० मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

१६)देखभाल दुरुस्तीचा दाखला आवश्यक आहे.

१७)काम अंतिम झाल्यनंतर सुरक्षा अनामत ५% रक्कम कामाचा दोषनिवारण कालावधी (६ महिने) संपल्यानंतर कंत्राटदाराच्या मागणीनुसार अदा करण्यात येईल.

१८)काम पूर्ण झाल्यानतर सर्व शासकीय कपाती करून देयक अदा करण्यात येईल.

१९)ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या निविदा शक्यतो दि. ०७/१२/२०२१ ला दुपारी ०३.०० वा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ग्रामपंचायत कार्यालय भूत्याणे ता.चांदवड जि.नाशिक येथे उघडण्यात येईल.

२०)मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम २.५% ही कामाचा करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत कार्यालय भूत्याणे ता.चांदवड जि.नाशिक येथे देणे असलेल्या धनाकर्षाचे स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत २.५% रक्कम देयकातून कपात केली जाईल.

२१)निविदा बाबतीत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२२)कोणतेही कारण न देता कोणतेही निविदा नाकारण्याचा अधिकार पूर्णपणे ग्रामपंचायतीकडे राखून ठेवण्यात येईल.

२३)काम मुदतीत पूर्ण न केल्यास रु.१०० (रु.शंभर) प्रती दिन दंड आकारण्यात येईल. सबळ कारणाशिवाय काम पूर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून दिला जाणार नाही.

२४)सर्वात कमी दरामध्ये निविदा सादर करणाऱ्या निविदा धारकाने जर वजा १% ते वजा १०% च्या रक्कमेमध्ये निविदा सादर केलेली असल्यास Performance Security Deposit कामाच्या रक्कमेचा १% डी.डी. निविदा उघडल्यानंतर पुढील आठ दिवसांच्या कालावधीत ग्रामपंचायतीकडे जमा करणे बंधानकारक राहील.त्याचप्रमाणे निविदा उघडल्या नंतर पुढील आठ दिवसाच्या कालावधीत रक्कम रुपये रु.१०० च्या स्टँप पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. या सर्व बाबींची मुदतीत पूर्तता न केल्यास आपली मानूर केलेली निविदा रद्द करण्यात येईल व त्यानंतर तुलनात्मक तक्त्यानुसार दुसऱ्या क्रमांकाच्या कंत्राटदाराची निविदा मंजूर केली जाईल व त्यांना त्या बाबतीत कळविले जाईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-XXXX
सरपंच
ग्रामपंचायत भूत्याणे ता.चांदवड

स्वाक्षरीत/-XXXX
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत भूत्याणे ता.चांदवड